**नि.दि.दावा क्र.१३५/२०१७**
**रज्ञाक खान वि. अबरार खान**
**निशाणी क्र. १७ क्रमशः**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ याचा पुढील सरतपास वादीचे वकील श्री. एस.व्ही. उगले यांचे मार्फत शपथेवर सुरू –**

**०५.** माझ्या पुरावा प्रतिज्ञालेखातील मजकुर खरा व बरोबर आहे. वाचुन समजुन मी त्यावर सही केली आहे.

**०६.** मी प्रकरणात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी कंपनीचे मुळ बिल सादर केले आहे, त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. मी प्रतिवादीला माझे वकीलामार्फत पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत सादर केली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे, त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते त्याच्या दोन पोस्टाच्या मुळ पावत्या मी सादर केलेल्या आहेत त्यांना **नि.क्र.२२ व २३** देण्यात येते. प्रतिवादीने मला दिलेल्या नोटीस जवाबाची मुळ प्रत मी सादर केली आहे, त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. पोस्टाच्या दोन पोच पावत्या सदर केल्या आहेत, त्यांना **नि.क्र. २५ व २६** देण्यात येते. मी प्रतिवादीला वकीलामार्फत पाठविलेली दुसरी नोटीसची स्थळप्रत सादर केली आहे, त्यास **नि.क्र.२७** देण्यात येते.

**पुढील सरतपास घेण्याकरीता वादीचे वकीलांनी तोंडी विनंती केली. विनंती मान्य. पुढील सरतपास पुढील तारखेपावेतो तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/–
( शिवनाथ एम. काळे )
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.

दि.०४.०८.२०२६